महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

टोल फ्री क्र. १८०० २२२ ०१९
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४
Email ID:-directoriayruralhousing@gmail.com
Website:- https://mahaawaas.com

जा.क्र./कावि/अतिक्रमण/तक्रार अर्ज/ ८११ /२०२३ दि: २८.०६.२०२३

प्रति,

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली.

विषय:- माजी सैनिकांच्या विधवांना सरकारी खुल्या जागेत घर बांधून मिळणेबाबत.

संदर्भ:- प्रआयो-२०२३/प्र.क्र.०२/यो-१० दि. १२.०४.२०२३. शेवंता दशरथ वायदंडे ता.कवठेमहांकाळ, जि. सांगली यांचे या कार्यालयास प्राप्त पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये शेवंता दशरथ वायदंडे ता.कवठेमहांकाळ, जि. सांगली यांचे कार्यालयास केलेले, दि.२५.०४.२०२३ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, ते सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. कृपया अवलोकन व्हावे.

त्या अनुषंगाने आपल्या स्तरावर चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदारास परस्पर कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

M Takale
(मंजिरी टकले)
उपसंचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत :- १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना माहितीस्तव.
२) कक्ष अधिकारी (यो-१०), ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव.

ग्रा.वि.व पं.राज/वि.शि/क्री.व युवक कल्याण/जनरल/२५६४/२०२३

मी अर्जदार -

शेवंता दशरथ वायदंडे
मु.पो. करोली (टी),
ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.
दिनांक -१४/२/२०२२
......................................

प्रति,
ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय
मुंबई नं. ३२

ग्रा.वि. व पं.रा. वि. (मं.स.), कार्यासन क्र. ......, दिनांक : २४/५/२३, नस्ती क्र. ५८३०

**विषय -**

**माजी सैनिकांच्या विधवांना सरकारी खुल्या जागेत घर बांधून मिळणेबाबत.**

महोदय,

आम्ही माजी सैनिकांच्या विधवा खालील नावाने विनंती करीत आहे.

| अ.क्र. | नांव | नाते |
|---|---|---|
| १. | शेवंता दशरथ वायदंडे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| २. | चंदाबाई भगवान चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ३. | शांताबाई हणमंत चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ४. | लक्ष्मी दादू चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ५. | बायाक्का चंदू चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ६. | [illegible]बाई बाबू चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ७. | जिजाबाई मारुती चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ८. | सुलाबाई गजानन चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ९. | फुलाबाई हिंदुराव चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| १०. | सुमन शामराव चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |
| ११. | बाबुराव बापू चंदनशिवे | माजी सैनिकाचा अपंग मुलगा |
| १२. | उमेश हणमंत चंदनशिवे | माजी सैनिकाचा अपंग मुलगा |
| १३. | गिता विजय पवार | माजी सैनिकाची विधवा पत्नी३ |
| १४. | संपताबाई जिवृती चंदनशिवे | माजी सैनिकाची विधवा पत्नी |

उप सचिव (ग्रामविकास), तपासून, उचित कार्यवाही करावी अशी मा. मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार विनंती आहे.

(स्वीय सहाय्यक) मंत्री ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

सन्माननीय महोदय, आम्ही वरील चौदाजण अर्जदार माननीय साहेबांना सविनय विनंती सादर करीत आहे की, गांव करोली (टी), ता. कवठेमहांकाळ येथील सरकारी जमीन गावाच्या उत्तर दिशेला पूर्व -पश्चिम असा ओढा आहे. दक्षिण - उत्तर अशी वघळ आहे आणि दक्षिण दिशेला रोहिदास समाज वस्ती आहे. याच्या मध्यभागात सरकारी खुली जमीन आहे. सदर या जमिनीवर आम्हांला शासकीय घरे बांधून मिळावीत म्हणून विनंती करीत आहे.

याविषयी लागणारी कागदांची कार्यवाही पुर्तता हवी असलेस ते गांवकामगार तलाठी आणि मंडल अधिकारी साहेबांच्याकडून याबाबतची सर्व माहिती घेणेत यावी आणि आम्हां प्रत्येकाला घरे बांधून द्यावीत म्हणून विनंती करीत आहे. कृपया, सदर या ठिकाणचे नाव माजी सैनिक वसाहत असे देण्यात यावे, ही विनंती.

अगर सदर दाखविलेल्या जागेवर ॲडजेस्ट होत नसेल तर करोली (टी), गावाच्या दक्षिण दिशेला सरकारी फॉरेस्ट जमीन आहे. करोली ते सलगरे जाणारा रोड आहे. रोडलगत यलम्मा देवीचे मंदिर आहे आणि तिथेच बिरोबाचे मंदीर आहे. या दोन्ही मंदिरांच्या दरम्यान सरकारी फॉरेस्ट जमीनीवर घरे बांधून दयावीत अशी आम्ही वरील चौदाजण विनंती करीत आहे. कृपया कार्यवाही व्हावी व तसे आम्हाला आपले कार्यालयातून पत्राद्वारे कळविण्यात यावे.

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 1086-42
आवक दिनांक - 20-06-23

कळावे,

आपली विश्वासू,

(शेवंता दशरथ वायदंडे)

माजी सैनिकाची विधवा पत्नी